महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं / प.मा / प.उ.मा. / 2356
नागपूर, दिनांक :– 25 / 07 / 2024

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै / ऑगस्ट – 2024 पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत.
संदर्भः– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं. / परीक्षा–6 / 2916, दि. 25 / 07 / 2024.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जुलै / ऑगस्ट 2024 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) च्या परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.......................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं./परीक्षा–६/२०७६
पुणे–४११ ००४
दिनांक–२५.०७.२०२४

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–४०००३२.
२) मा. विभागीय प्रसिध्दी संचालक, पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई–४०००३०.
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई–२०
५) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/ छ. संभाजीनगर/मुंबई/जळगाव/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/ अमरावती/नाशिक/रत्नागिरी
६) मा. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

**विषय–माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जुलै–ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत...**

महोदय,

जुलै–ऑगस्ट २०२४ ची माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि.३०/०७/२०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि.०८/०८/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. दि. २६/०७/२०२४ रोजी राज्याच्या काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

सबब माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षेतील दि. २६/०७/२०२४ रोजीच्या परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. सदरच्या प्रकटनास कृपया विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

आपली विश्वासु,

(मेधा निरफराके)
सहसचिव,
राज्यमंडळ, पुणे–०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–
१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/छ. संभाजीनगर/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

माहितीस्तव सविनय सादर–
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
मा. खाजगी सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जुलै–ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

॥ प्र क ट न ॥

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ३०/०७/२०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि दि. २६/०७/२०२४ रोजी राज्याच्या काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. २६/०७/२०२४ रोजी होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) | बुधवार दि. ३१ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते १.००<br>विषय– विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) |

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–**EB to XB=20** विषय | शुक्रवार दि. ०९ ऑगस्ट, २०२४<br>सकाळ सत्र– ११.०० ते २.००<br>विषय– वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय– अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय– एम.सी.व्ही.सी. पेपर–२–**EB to XB=20** विषय |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२४ लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक–२५/०७/२०२४

(मेधा निरफराके)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.